# उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा यांचे कार्यालय जिल्हा नंदुरबार
## कोतवाल संवर्गातील पंद भरतीसाठी जाहीरात 2023

(जाहिरात क्रमांक 01/2023)

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासननिर्णय क्रं.बीसीसी-1097/प्र.क्र.63/97/16 ब,दिनांक 18/10/1998 व महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रं.केओटी/3906/1737/प्र.क्र.220/ई-10 दिनांक 09/09/2009 तसेच, शासन निर्णय क्रं.केओटी/2012/प्र.क्र. /432/ई-10 दिनांक 5/9/2013., शासन निर्णय क्रं.संकीर्ण- 2023/प्र.क्र. 17/ ई-10 दिनांक 17/05/2023 शासनाकडील पत्र क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ ई-10 दि.17/05/2023, मा.जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडील पत्र क्रं.पत्र क्रं./टेनन्सी/कक्ष-7/फ/कावि-815/2023 दिनांक 31/07/2023 व महिला आरक्षण सोडत दिनांक 18/08/2023 चे इतिवृत्त.

---

तमाम लोकांना या जाहीर निवेदनाव्दारे कळविणेत येते की, शहादा व अक्राणी तालुक्यातील सजांचे कोतवाल पद रिक्त असल्याने त्या रिक्त पदावर नवीन कोतवाल भरती प्रक्रिया दिनांक 18/08/2023 ते दि. 27/09/2023 या दरम्यान राबविण्यात येत आहे.

मा.शासनाकडील पत्र क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दि.17/05/2023 अन्वये कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या 80% मर्यादेत पंदे भरण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे.

शहादा तालुक्यातील कोतवाल (तात्पुरत्या स्वरूपात) रिक्त पदे :- 32 (80% प्रमाणे भरावयाची पदे 26)
अक्राणी तालुक्यातील कोतवाल (तात्पुरत्या स्वरूपात) रिक्त पदे :- 03 (80% प्रमाणे भरावयाची पदे 02)

| **ऑफलाईन अर्ज भरण्यास सुरूवात** | **ऑफलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत** |
|---|---|
| दिनांक 22/08/2023 रोजी पासून | दिनांक 04/09/2023 रोजी पर्यंत |

कोतवाल भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहीरात https://nandurbar.gov.in/notice/shahada-sub-divisional-office-kotwal-recruitment-2023/ या संकेतस्थळावर व संबंधीत सजेचे तलाठी तसेच तहसिल कार्यालय शहादा व अक्राणी येथे उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहिती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑफलाईन पध्दतीने संबंधीत तहसिल कार्यालयात अर्ज सादर करावे. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त स्थळावरून अर्ज डाऊनलोड करून किंवा संबंधीत सजेचे तलाठी किंवा तहसिल कार्यालय शहादा व अक्राणी येथून विहीत अर्ज घेऊन अर्ज भरून ऑफलाईन पध्दतीने परीक्षाशुल्क अर्जासोबत रोखीने जमा केल्याची पावती ग्राहय धरण्यात येईल. इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येणार नाही. सदर संबंधीत तहसिल कार्यालयात भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया/लेखी परिक्षा स्थगीत करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांचा एकुण संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, शहादा भाग शहादा यांना राहतील.

**दिनांक** :- 21/08/2023

(सुभाष दळवी)
**अध्यक्ष**
**कोतवाल निवड समिती 2023**
**तथा उपविभागीय अधिकारी,**
**शहादा भाग शहादा**

Scanned by CamScanner

# उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा यांचे कार्यालय जिल्हा नंदुरबार
## कोतवाल संवर्गातील पद भरतीसाठी जाहीरात 2023

(जाहिरात क्रमांक 01/2023)

शहादा व अक्राणी तालुक्यातील सजांचे कोतवाल या संवर्गातील रिक्त भरण्याकरीता अर्हता धारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज फक्त https://nandurbar.gov.in/notice/shahada-sub-divisional-office-kotwal-recruitment-2023 या संकेतस्थळावर डाऊनलोड केलेले अर्ज व संबंधीत सजेचे तलाठी तसेच तहसिल कार्यालय शहादा व अक्राणी येथे उपलब्ध असलेले विहीत नमुन्यातील अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

मा. शासनाकडील पत्र क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दिनांक 07/05/2023 अन्वये कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या 80% मर्यादेत पदे भरण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे.

| ऑफलाईन अर्ज भरण्यास सुरवात | ऑफलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 22/08/2023 रोजी पासून | दिनांक 04/09/2023 रोजी पर्यंत |

**टिप** :- सदर अर्ज दिनांक 26/08/2023, 27/08/2023, 02/09/2023 व 03/09/2023 हे सुटीचे दिवस वगळून स्विकारले जातील.

संबंधित तहसिल कार्यालयात ऑफलाईन पध्दतीने परीक्षाशुल्क अर्जासोबत रोखीने जमा करण्याचा अंतिम दिनांक 04/09/2023 सांयकाळी 05.00 वाजेपावेतो.

कोतवाल भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहीरात https://nandurbar.gov.in/notice/shahada-sub-divisional-office-kotwal-recruitment-2023/ या संकेतस्थळावर व संबंधीत सजेचे तलाठी तसेच तहसिल कार्यालय शहादा व अक्राणी येथे उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहिती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करावे. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त स्थळावरून अर्ज डाऊनलोड करून अर्ज भरून व संबंधीत सजेचे तलाठी तसेच तहसिल कार्यालय शहादा व अक्राणी येथे उपलब्ध असलेले विहीत नमुन्यातील अर्ज भरून संबंधित तहसिल कार्यालयात ऑफलाईन पध्दतीने परीक्षाशुल्क अर्जासोबत रोखीने जमा केल्याची पावती ग्राहय धरण्यात येईल. इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया/लेखी परिक्षा स्थगीत करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांचा एकुण संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, शहादा भाग शहादा यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

**रिक्त पदांचा तपशिल :-**

1. कोतवाल (तात्पुरत्या स्वरूपात) दरमहा मानधन रक्कम रु. 15000/- अक्षरी (रूपये पंधरा हजार फक्त) इतके शासन निर्णय महूसल व वन विभाग क्र.संकीर्ण-2022/प्र.क्र./191/ई-10 दिनांक 06/04/2023 अन्वये

Scanned by CamScanner

| अ.क्र. | तालुका | सजा | सजेतील गांवे | सजेस असलेले आरक्षण | समांतर महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शहादा | भागापुर | भागापुर, जवखेडा, पाडळदा खुर्द. | अनुसूचित जमाती | महिला |
| 2 | शहादा | खेडदिगर | खेडदिगर, रायखेड, बिलाडी त.ह, बहिरपुर. | अनुसूचित जमाती | महिला |
| 3 | शहादा | कुढावद | कुढावद, पिंपळोद, लाछोरा. | अनुसूचित जमाती | महिला |
| 4 | शहादा | जावदे त.ह. | जावदे त.ह, जाम ओझर्टे, भोरटेक. | अनुसूचित जमाती | महिला |
| 5 | शहादा | फत्तेपुर | फत्तेपुर, दरा, मडकाणी, रामपुर, तलावडी. | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |
| 6 | शहादा | काथर्दे दिगर | काथर्दे दिगर, नांदर्डे. | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |
| 7 | शहादा | कलमाडी त.बो. | कलमाडी त.बो, सोनवल त.बो, ठेंगचे. | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |
| 8 | शहादा | गणोर | गणोर, खरगोन, टवळाई, आडगाव, मुबारकपुर. | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |
| 9 | शहादा | सावखेडा | सावखेडा, कमरावद, वडछील. | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |
| 10 | शहादा | इस्लामपुर | इस्लामपुर, अंबापुर, लक्कडकोट. | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |
| 11 | शहादा | लंगडी | लंगडी, चांदसैली, मलगाव, मानमोड्या, शहाणा, भुलाणे. | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |
| 12 | शहादा | चिखली बु. | चिखली बु., बुडीगव्हाण, कानडी त.ह, शिरूड त.ह. | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |
| 13 | शहादा | मलोणी | मलोणी, तिखोरा. | अनुसूचित जाती | सर्वसाधारण |
| 14 | शहादा | वैजाली | वैजाली, करणखेडा. | विजाभज | सर्वसाधारण |
| 15 | शहादा | प्रकाशा | प्रकाशा. | इतर मागास प्रवर्ग | सर्वसाधारण |
| 16 | शहादा | डोंगरगाव | डोंगरगाव. | खुला | सर्वसाधारण |
| 17 | शहादा | फेस | फेस, दोंदवाडे. | इतर मागास प्रवर्ग | सर्वसाधारण |
| 18 | शहादा | मोहिदे त.श. | मोहिदे त.श. | खुला | सर्वसाधारण |
| 19 | शहादा | कळंबु | कळंबु | खुला | महिला |
| 20 | शहादा | वडाळी | वडाळी | इतर मागास प्रवर्ग | महिला |
| 21 | शहादा | सावळदा | सावळदा, वरूळ त.श, कानडी त.श. | अनुसूचित जाती | सर्वसाधारण |
| 22. | शहादा | सोनवद त.श. | सोनवद त.श, कवठळ त.श. | अनुसूचित जाती | सर्वसाधारण |
| 23 | शहादा | लांबोळा | लांबोळा, मनरद. | ईडब्ल्युएस | सर्वसाधारण |
| 24 | शहादा | शहादा | शहादा | अनुसूचित जाती | महिला |
| 25 | शहादा | कुकडेल | कुकडेल | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |
| 26 | शहादा | बामखेडा त.त. | बामखेडा त.त, खैरवे, भडगाव. | इतर मागास प्रवर्ग | सर्वसाधारण |
| 27 | अक्राणी | तलाई | तलाई, पानबारी, मोख खुर्द, मोख बु. केला केला खुर्द, केला बु., खुषगव्हाण. | अनुसूचित जमाती | महिला |
| 28 | अक्राणी | राडीकलम | राडीकलम, चिप्पल, कुसुमवेरी, मनखेडी खु., मनखेडी बु., पालखा, नवागाव. | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण |

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ठराव क्र. पीकेए/1051/ल-6, दिनांक 07/05/1959 प्रमाणे कोतवालांच्या नेमणूका व नोकरी याबाबत अटी व शर्ती उमेदवारांवर बंधनकारक राहतील. तसेच कोतवाल पदासाठी इच्छूक उमेदवार पुढील नमूद केलेल्या अटीस पात्र असणे आवश्यक आहे.

1) कोतवाल भरतीसाठी उमेदवारांचे वय दिनांक 01/08/2023 रोजी 18 ते 40 वयोगटातील असावेत.

Scanned by CamScanner

2) अर्जदार यांनी ज्या **सजेतील पदासाठी** अर्ज सादर केला आहे, त्याच सजातील अंतर्भूत असलेल्या गावांमधील अर्जदार स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे.त्याबाबतचा पुरावा अर्ज भरतेवेळी आवश्यक राहील.

3) कोतवाल पदासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक अर्हता 4 थी पास इतकी असावी.

4) अर्जदार हा कोतवाल पदाची कर्तव्ये पार पाडण्यास शारीरिकदृष्ट्या सक्षम असावा.

5) मागासवर्गीय उमेदवाराने पुरावा म्हणून सक्षम प्राधिका-यांनी दिलेले जात प्रमाणपत्र छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.

6) अर्जदार व्यक्ती विरुद्ध कोणत्याही गुन्ह्याची नोंद झालेली नसावी अथवा उमेदवारास कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी. याबाबत संबंधित पोलीस स्टेशनचा दाखला छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.

7) उमेदवारांना लेखी परिक्षेला व कागदपत्रे पडताळणीकामी उपस्थित राहण्यासाठी कोणताही प्रवास खर्च व इतर खर्च दिला जाणार नाही.

8) उमेदवार अनुसूचित जाती/जमाती व खुल्या प्रवर्गातील उमेदवाराव्यतिरिक्त असल्यास अशा उमेदवारांना प्रगत उन्नत गटात मोडत नसलेबाबत सक्षम अधिका-याचे (नॉन क्रिमीलेअर) सन 2023-24 पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र कागदपत्र छाननीचे वेळी जोडणे आवश्यक राहील. असे प्रमाणपत्र छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.

9) भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रिया पूर्ण होईपावेतो सुधारित शासन निर्णय/परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

10) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम 2005 मधील 4 मधील तरतुदीनुसार कुटुंबात दिनांक 28/03/2005 नंतर जन्मलेले दोन पेक्षा जास्त अपत्य नाहीत याबाबतचा नमुना-अ मधील कागदपत्रांची छांननीवेळी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

11) अर्ज पुर्ण माहितीसह व अचूक भरावा, त्यात नमूद करणेत आलेली सर्व माहिती खरी असणे बंधनकारक आहे.

❖ **परिक्षेचे स्वरुप**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | लेखी परिक्षेसाठी गुण |
|---|---|---|
| 1 | **कोतवाल (तात्पुरत्या स्वरुपात)** | 100 |

❖ **लेखीपरिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे व उत्तरपत्रिकेचे स्वरुप व कार्यक्रम**

1. परिक्षेची उत्तरपत्रिका ही “OMR Sheet” प्रकाराची असेल. सदर “OMR Sheet” मधील गोल चिन्ह हे परिपुर्ण रित्या भरल्याशिवाय सदर प्रश्न तपासला जाणार नाही. एका प्रश्नाचा उत्तरात एकापेक्षा अधिक गोल चिन्हांवर निशाणी केल्यास सदर उत्तर बाद समजण्यात येईल.
2. उत्तर पत्रिकेत फक्त काळया बॉल पेनने उत्तर चिन्हाकींत करावे. इतर रंगाच्या पेनाने चिन्हांकित केलेले उत्तर बाद समजण्यात येईल. तसेच इतर रंगाच्या कोणत्याही पेनने उत्तरपत्रिकेवर कोणत्याही प्रकारची विशिष्ट खुण किंवा इतर तत्सम चिन्ह /नाव/स्वाक्षरी आढळून आल्यास सदर उत्तरपत्रिका बाद ठरवली जाईल.
3. लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. (प्रश्न संख्या 50)

Scanned by CamScanner

4. कोतवाल (तात्पुरत्या स्वरुपात) पदाची लेखी परीक्षा सामान्यज्ञानावर व इतर बाबींवर आधारीत असेल.

5. उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळप्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

6. लेखी परीक्षेत गुणवत्तेनुसार पात्र ठरणा-यां उमेदवाराची तात्पुरती कागदपत्र तपासणीकामी निवड यादी संबंधीत तहसिल कार्यालयात प्रसिध्द करण्यात येईल. तसेच कागदपत्र तपासणी अंती अंतिम निवड यादी संबंधीत तहसिल कार्यालयात प्रसिध्द करण्यात येईल.

i. लेखी परिक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संबंधित तहसिल कार्यालयातच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संबंधित तहसिल कार्यालयात भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

ii. तसेच परिक्षेपूर्वी प्रवेशपत्र संबंधित तहसिल कार्यालयतून दिनांक 08/09/2023 ते 11/09/2023 या कालावधीत कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल. **सदर प्रवेशपत्रावरच उमेदवारास परिक्षेकरीता प्रवेक्ष दिला जाईल यांची नोंद घ्यावी.**

❖ **निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.**

1. लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

2. लेखी परीक्षेअंती पात्र उमेदवारांचे जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑफलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑफलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिद्ध होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑफलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशा उमेदवारांचे मागीतलेले सामाजिक आणि/किंवा समांतर आरक्षण अथवा प्रक्रिया शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

3. उमेदवार शारिरीक दृष्ट्या सक्षम असल्या बाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल व उमेदवाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.

4. उमेदवाराचे चारित्र्य निष्कलंक असल्या बाबतचे संबांधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.

5. कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंध न ठेवणेबाबतचे रुपये 100 च्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.

6. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.केओटी-6073/30004/ल, दिनांक 28/02/1974 नुसार कोतवाल म्हणून नेमणूक करतांना इतर सर्व निकष समान असतील तर त्या सजेतील पुर्वीच्या कोतवालांच्या वारसांना इतर उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल. तसेच

Scanned by CamScanner

कोतवालांच्या वारसाव्यतिरिक्त इतर दोन उमेदवारांचे अंतिम गुण सारखे असल्यास उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 13 जुनं 2018 मधील नमुद निकषावर लावला जाईल.

7. उमेदवाराने अर्ज केलेल्या सजेतील गावातील स्थानिक रहिवासी असणे आवश्यक.

8. उमेदवार कोणत्याही एकाच सजेतील स्थानिक/कायमचा रहिवासी असु शकतो सबब उमेदवाराने अशाच एका सजेत अर्ज करावा.

9. प्रत्येक सजेत केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषांनुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करताना उमेदवाराने आरक्षण तपासूनच अर्ज करावा.

10. संपुर्ण शहादा व अक्राणी तालुक्यासाठी कोतवाल पदांसाठी एकाच दिवशी एकाच वेळी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल.

11. संपुर्ण भरती प्रक्रिया सजेनिहाय होणार असून कोणत्याही दोन सजेच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

12. कोतवाल हे पद वर्गीकृत नाही.

13. कोतवालांना क्षेत्रिय स्तरावर (Field Work) काम करावे लागते त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारिरीक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगांसाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

14. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि. 12/12/2011 मधील तरतुदीनुसार याचिका क्र. 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 06 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

15. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित्त जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे सन 2023-24 पर्यंत वैध असलेले नॉनक्रिमीलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉनक्रिमीलेअरचे तत्व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागासप्रवर्गांना लागू राहील.

16. अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑफलाईन अर्जात नमुद करणे अनिवार्य आहे.

17. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही 2000/प्र.क्र.17/2000/12, दि.28/03/2005 व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही.2000/ प्र.क्र.17/2000/12 दि. 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 अन्वये दि. 28/03/2005 रोजी

Scanned by CamScanner

नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**ऑफलाईन अर्ज करण्याची पद्धत**

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त https://nandurbar.gov.in/notice/shahada-sub-divisional-office-kotwal-recruitment-2023 या अधिकृत संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेल्या विहित नमुन्यातील अर्ज अथवा संबंधीत तलाठी व तहसिल कार्यालय येथे उपलब्ध केलेला विहित नमुन्यातील ऑफलाईन पध्दतीने केलेले अर्ज संबंधित तहसिल कार्यालयात स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
2. सदर उमेदवारांनी ऑफलाईन अर्जात मोबाईल नंबर भरणे अनिवार्य आहे.
3. उमेदवारांचे अर्ज ऑफलाईन (**Offline**) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे, हमीपत्रे **अर्ज जमा करते वेळेस अर्जासोबत सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहील**. तसेच, ऑफलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑफलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑफलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासूनच ऑफलाईन अर्ज भरावा.
4. उमेदवाराची लेखीपरीक्षा ही त्यांनी ऑफलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखीपरिक्षेच्या गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑफलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार मुळ कागदपत्रे पडताळणीकामी यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार उपविभागीय अधिकारी, शहादा भाग शहादा यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.
5. ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://nandurbar.gov.in/notice/shahada-sub-divisional-office-kotwal-recruitment-2023 या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
6. संकेतस्थळावरुन, डाऊनलोड केलेला ऑफलाईन अर्ज अथवा सबंधीत सजेचे तलाठी व तहसिल कार्यालयातून उपलब्ध केलेला अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर संबंधीत तहसिल कार्यालयात अर्जासोबत रोखीने परिक्षा शुल्क भरता येईल.

Scanned by CamScanner

7. ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो 3 प्रतीत अर्जासोबत जोडणे तसेच फोटोच्या पाठीमागे स्वाक्षरी करणे अनिवार्य राहील.

8. ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळे नंतर ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही.

9. ऑफलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परिक्षाकेंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती संबंधीत तहसिल कार्यालयात वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संबंधीत तहसिल कार्यालयात भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

10. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्तजाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वर्ष 2023-24 या कालावधीत करिता वैध असलेले (अद्यावत अर्थात 31/03/2024 पर्यंत वैध असलेले) (नॉनक्रिमिलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

11. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

12. ऑफलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

13. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी /नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल

14. अपात्र अर्जदारांस स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

15. परीक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

16. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरीक्त शासनाने तसेच अध्यक्ष निवड समिती यांनी वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

Scanned by CamScanner

❖ परिक्षेचे शुल्क

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| 1 | कोतवाल खुला प्रवर्ग (तात्पुरत्या स्वरुपात) | 400/- |
| 2 | कोतवाल मागास प्रवर्ग (तात्पुरत्या स्वरुपात) | 200/- |

❖ रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | कालवधी |
|---|---|---|
| 1 | जाहीरनामा प्रसिध्दी | दि. 21/08/2023 पासून |
| 2 | ऑफलाईन अर्ज स्विकृती कालावधी | दि. 22/08/2023 ते 04/09/2023 (सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 पर्यंत) **सदर अर्ज दिनांक 26/08/2023, 27/08/2023, 02/09/203 व 03/09/2023 हे सुटीचे दिवस वगळून स्विकारले जातील.** |
| 3 | अर्ज छाननी कालावधी | दि. 05/09/2023 ते 06/09/2023 |
| 4 | पात्र उमेदवार यादी प्रसिध्दी | दि. 07/09/2023 |
| 5 | प्रवेशपत्र वाटप (हॉल टिकीट वाटप) | दि. 08/09/2023 ते 11/09/2023 |
| 6 | लेखी परिक्षा | दि. 17/09/2023 (वेळ सकाळी 11:00 ते 1:00) |
| 7 | लेखी परिक्षा निकाल जाहीर | दि. 17/09/2023 |
| 8 | निवड झालेल्या उमेदवारांची प्रारूप यादी प्रसिध्दी | दि. 18/09/2023 |
| 9 | प्रारूप यादीवर हरकत घेण्याचा कालावधी | दि. 20/09/2023 ते 22/09/2023 (सुटीचे दिवस वगळून) |
| 10 | निवड झालेल्या उमेदवार यांची कागदपत्र पडताळणी | दि. 25/09/2023 |
| 11 | निवड झालेल्या उमेदवार अंतीम यादी प्रसिध्दी | दि. 26/09/2023 |
| 12 | निवड झालेल्या उमेदवार यांना नियुक्ती आदेश देणे | दि. 27/09/2023 |

❖ **विशेष सूचना :-**

- **या पदाकरीता ऑफलाईन पध्दतीने अर्ज भरताना उमेदवारांना अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे अर्जदार यांना जोडणे आवश्यक राहील. तसेच ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.**
- अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी संबधित तहसिल कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.

**दिनांक** :- 21/08/2023

(सुभाष दळवी)
**अध्यक्ष**
**कोतवाल निवड समिती 2023**
**तथा उपविभागीय अधिकारी,**
**शहादा भाग शहादा**

Scanned by CamScanner